महाराष्ट्र विकास सेवा गट -अ मधील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन आदेश क्रमांक : मविसे-१०१९/प्र.क्र.७४/२०१९/आस्था-३,

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई - ४०० ००१.

तारीख : ०५ ऑगस्ट, २०१९.

शासन आदेश :-

सार्वजनिक सेवेच्या हितार्थ महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम , २००५ मधील तरतुदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने आणि उक्त अधिनियमाच्या कलम ४ (१) (२) (४) व ४(५) मधील तरतुदीनुसार या विभागातील खालील अधिकाऱ्यांच्या त्यांच्या बदल्यांचे आदेश शासन देत आहे. बदलीनंतर संबंधित अधिकाऱ्यांची नियुक्ती त्यांच्या नावासमोरील स्तंभ क्र .३ मध्ये दर्शविलेल्या पदावर करण्यात येत आहे :-

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नाव, सध्या धारण केलेले पद व ठिकाण	बदलीने पदस्थापनेचे पद व ठिकाण	शेरा
(१)	(२)	(३)	(४)
१.	श्री.सी.जी.चव्हाण, गट विकास अधिकारी, पंचायत समिती दर्यापूर, जिल्हा अमरावती	उप मुख्य कार्यकारी अधिकारी(साप्र), जिल्हा परिषद यवतमाळ, जिल्हा यवतमाळ	रिक्त पदी
२.	श्री.सी.वाय.खंदारे (नियुक्तीशिवाय)	उप संचालक (कृतीसंघम), महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बेलापूर	श्री.सोनवणे, यांच्या जागी. दि.३१.०५.२०१९ च्या बदली आदेशात अंशत: बदल करुन रिक्त पदी
३.	श्री.व्ही.एफ.परदेशी, गट विकास अधिकारी, पंचायत	गट विकास अधिकारी, पंचायत समिती गंगापूर, जिल्हा	दि.३१.०५.२०१९ च्या बदली आदेशात

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नाव, सध्या धारण केलेले पद व ठिकाण	बदलीने पदस्थापनेचे पद व ठिकाण	शेरा
(१)	(२)	(३)	(४)
	समिती कन्नड , जिल्हा औरंगाबाद	औरंगाबाद	अंशत: बदल करुन रिक्त पदी
४.	श्री.के.डी.शिंदे गट विकास अधिकारी , पंचायत समिती खामगांव , जिल्हा बुलडाणा	गट विकास अधिकारी , पंचायत समिती शिंदखेड-राजा, जिल्हा बुलडाणा	रिक्त पदी
५.	श्री.बी.एस.रेंगडे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले, जिल्हा अहमदनगर	गट विकास अधिकारी, पंचायत समितीअक्राणी-धडगांव, जिल्हा नंदुरबार	निवडश्रेणी नसल्याने शासन निर्णय दि.०६.०८.२०१६ च्या तरतुदीनुसार बिगर निवडश्रेणी रिक्त पदी
६.	श्री.ए.एस. सोनवणे, उप संचालक, कृतीसंगम, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान , बेलापूर, नवी मुंबई	प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा नंदूरबार	रिक्त पदी दि.०६.०६.२०१९ रोजीच्या पदोन्नती आदेशामध्ये अंशत: बदल करुन
७.	श्री.आर.बी.सोमवंशी, अति,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा नंदुरबार,	अति,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड, जिल्हा रायगड	रिक्त पदी
८.	श्रीम.एस.जी.पाटील, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, जिल्हा बीड	प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, जिल्हा औरंगाबाद	रिक्त पदी
९.	श्री.एस.बी.लांगोरे, तत्का.उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे	प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, जिल्हा पुणे	दि.२८.०२.२०१९ रोजीच्या बदली आदेशात अंशत: बदली करुन रिक्त पदी
१०.	श्री.ए.एस.भंडारी,	अति,मुख्य कार्यकारी अधिकारी,	रिक्त पदी

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नाव, सध्या धारण केलेले पद व ठिकाण	बदलीने पदस्थापनेचे पद व ठिकाण	शेरा
(१)	(२)	(३)	(४)
	प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद अमरावती	जिल्हा परिषद बीड, जिल्हा बीड	
११.	श्रीमती लीना बनसोड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संवर्ग (सध्या नियुक्तीशिवाय)	अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम, जिल्हा वाशिम	रिक्त पदी
१२.	श्री.एन.पी.मित्रगोत्री, अति,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे, जिल्हा पुणे	संचालक, राजीव गांधी पंचायत राज सक्षमीकरण अभियान, पुणे (प्रतिनियुक्तीने)	श्री.डी.डी.शिंदे, यांच्या जागी
१३.	श्री.बी.बी.शेंडगे, उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई	अति,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे, जिल्हा पुणे	श्री.एन.पी.मित्रगोत्री, यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदी
१४.	श्री.जी.डी.भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई	उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई	श्री.बी.बी.शेंडगे, यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदी
१५.	श्री.ए.एस.मोरे, तत्का.प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा नाशिक	उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक	दि.०६.०६.२०१९ रोजीच्या आदेशामध्ये अंशतः बदल करुन रिक्त पदी

२. संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा पदभार त्वरीत स्वीकारावा . तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक : सीडीआर १०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३०.८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास , ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

३. संबंधित विभागीय आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बदली झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमुक्त करावे व त्यांच्या नियुक्तीच्या जागी तात्काळ रुजू होण्यास सांगावे.

४. संबंधित अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व पदभार स्वीकारल्याचा दिनांक शासनास कळवावा. जे अधिकारी कार्यमुक्तीनंतर विहित कालावधीत बदली झालेल्या पदावर रुजू होणार नाहीत, अशा अधिकाऱ्यांविरुध्द संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय आयुक्तांमार्फत शिस्तभंग विषयक कार्यवाहीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०३१५५३५९४४२० डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ananda Shankar Shendage

Digitally signed by Ananda Shankar Shendage
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0db7067f83b51744741b4485650e dc8705560188be635df819605b4913ead056, serialNumber=dced31ba3ba0e455430f6730 4905c6e3544dae39602268d4cf2844818a1f8 0a4, cn=Ananda Shankar Shendage
Date: 2019.08.05 15:51:02 +05'30'

(आ.शं. शेंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
३) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
४) मा. प्रधान सचिव (ग्राम विकास व पंचायत राज) यांचे स्वीय सहायक.
५) सर्व विभागीय आयुक्त
६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
८) महालेखापाल - १/२ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
९) संबंधित अधिकारी (संबंधित विभागीय आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत.)
१०) कार्यासन, आस्था-२, ग्राम विकास विभाग
११) निवड नस्ती (कार्यासन, आस्था-३), ग्राम विकास विभाग.